वाचले:- १)श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका) यांचा दि.०१/११/२०१८ चा अर्ज

२)मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय नेहरूनगर यांचे दि.१०/०१/२०१९ रोजीचे पत्र.

३)महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम ६६

४)मा.आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/२०१५.

५)महाराष्ट्र शासन शिक्षण सेवा योजन विभाग निर्णय क्र पीईएन - १०७८ / ११०५ / २०६५ / माशि- ०६ दि.०९/०९/१९८८

६)मा.लेखाधिकारी यांचेकडील दिनांक २७/११/२०१८ चे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र

७)मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र प्रशा/२/कावि/५४६/२०१६ दि ७/१०/२०१६

८)मा.शिक्षणाधिकारी यांचेकडील दिनांक १७/०१/२०१९ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे - १८
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/१/कावि/४८/२०१९
दि.१७/०१/२०१९

विषय – श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका) यांचे स्वेच्छानिवृत्ती मंजुर करणेबाबत (संगणक क्रं.५८१७)

<u>आदेश</u>,

श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका) ह्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहा.शिक्षिका या पदावर माध्यमिक शिक्षण विभागाअंतर्गत माध्यमिक विद्यालय नेहरूनगर या विद्यालयात कार्यरत असुन त्यांनी दि. ०१/११/२०१८ रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छानिवृत्ती देणेची विनंती केली आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ मध्ये शासकीय कर्मचा-याची २० वर्ष इतकी अर्हताकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर नियुक्ती प्राधिका-यांस ०३ महिन्याची लेखी नोटीस देउन सेवेतुन केव्हांही सेवानिवृत्त होता येईल अशी तरतुद आहे.आदेश क्र.प्रशा/०२/कावि/५४६/२०१६ दि.०७/१०/२०१६ अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचा-याने स्वेच्छा निवृत्तीबाबत लेखी नोटीशीची तीन महीन्याची मुदत संपल्यानंतरच्या लगतच्या दिनांकास मध्यान्हनंतर महापालिका सेवेमधुन सेवानिवृत्त करण्यात यावे. असे आदेश पारित करण्यात आले आहेत.

श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका)म.न.पा.मध्ये दि. २१/१०/१९९१ रोजी सहा.शिक्षक अभिनामाच्या पदावर रूजू झाल्या आहेत. त्यांची सेवानोंद पुस्तकातील नोंदीनुसार जन्मतारीख ०१/०६/१९६३ अशी आहे.मुख्याध्यापक मा.वि. नेहरूनगर यांनी त्यांचेकडील पत्रान्वये, श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका) यांचे सेवानोंद पुस्तकाची पाहणी केली असता त्यांना दि.०१/०६/१९९० ते २०/१०/१९९१ पर्यंत सेवाखंडीत दिलेले आहे,असे दिसून येत आहे. त्यांची स्वेच्छानिवृत्तीच्या

Scanned by CamScanner

तारखेपर्यंत म्हणजेच दि.२९/०१/२०१९ अखेर मनपामध्ये एकूण २७ वर्ष ०३ महिने ०९ दिवस सेवा पूर्ण होत आहे.

मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय नेहरूनगर यांनी वाचले क्र.०२ रोजीच्या पत्रान्वये श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका) यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहायचौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.त्यांचेकडुन महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम यांचेकडील कर्ज येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत. घरबांधणी अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र.६ अन्वये मा.लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे. तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचे कडील दि.०४/०१/२०१९ रोजीचा थकबाकी नसले बाबतचा दाखला सादर केलेला आहे.असा अहवाल सादर केला असुन स्वेच्छासेवानिवृत्ती मंजूर करणेस स्पष्ट शिफारस केलेली आहे.

सबब,श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका) यांनी दि.०१/११/२०१८ रोजीच्या अर्जान्वये स्वेच्छासेवानिवृत्ती मिळावी म्हणून केलेली विनंती मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय नेहरूनगर यांच्याकडील शिफारस व महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन १९८२ मधील उक्त तरतूद विचारात घेउन श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका) यांना २९/०१/२०१९ रोजी मध्यान्हंतर महापालिका सेवेतून स्वेच्छासेवानिवृत्ती देण्यास या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

तथापी लेखापरीक्षणार्थ येणे रक्कम निघाल्यास ती.श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका) यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तूत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकांमध्ये घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्रीम.रत्नपारखी सुनंदा सुधिर (सहा.शिक्षिका)
माध्यमिक विद्यालय नेहरूनगर

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय नेहरूनगर
२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned by CamScanner